“Dissemination of Education for Knowledge, Science and Culture”

- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha’s

# Vivekanand College, Kolhapur

***(Autonomous)***

# Department of Physics

## Publication of “Lahan Vhaychay”: Poetry Collection

by

**Miss. Sanyogita Sanjay Patil**

(M.Sc. Physics: 2022 – 23 Batch)

On

**Monday, 15th August 2022**

## Publisher

Darya Publisher, C-14, Shivsmruti Society,

S/R No. 77/2 C, Bharati Vidyapeeth, Katraj, Pune – 411 046,

Maharashtra, India.

**(2022 – 23)**



संयोगिता पाटील

'लहान व्हायचंय...' हा संयोगिता संजय पाटील या आमच्या कन्येचा शाळकरी मुलीचे भावविश्व रेखाटणारा कवितासंग्रह. बालवयात आपल्या भोवतालातील वस्तू, निसर्ग, माणसं, त्यांच्याशी असणारे नातेसंबंध, मैत्री, शाळा, गाव, घर, सण, उत्सव इत्यादींविषयी पडलेले प्रश्न आणि त्या प्रश्नांशी लपंडाव खेळताना शोधलेली उत्तरं, जाणवलेल्या भावना या कवयित्रीने शब्दांत टिपल्या आहेत. या कविता म्हणजे कोवळ्या मनाला भावलेली भावनांची बाराखडी आहे. ही बाराखडी गिरवत ती कवितेच्या प्रांतात पहिले पाऊल ठेवत आहे. तिच्या कविता लेखनाच्या पुढील प्रवासास शुभेच्छा!

**राजन गवस**

प्रकाशन

# लहान व्हायचंय

संयोगिता पाटील



# लहान व्हायचंय...

संयोगिता पाटील

लहान व्हायचंय.../ संयोगिता पाटील (कवितासंग्रह)
Lahan Vhaychay... / Sanyogita Patil / (Poetry Collection)

पहिली आवृत्ती
१५ ऑगस्ट, २०२२

© प्राचार्य, डॉ. संजय पाटील
मु. पो. अर्जुनवाडा, ता. राधानगरी,
जि. कोल्हापूर ४१६२०८
संपर्क : ९५६११०८२४८

प्रकाशक
**दर्या प्रकाशन**, सी-१४, शिवस्मृती सोसायटी,
एस/आर क्र. ७७/२ सी, भारती विद्यापीठ,
कात्रज, पुणे ४११०४६.
मोबा. ०७८४१०५६३०१/०९८५०७११६३०

मुद्रक
भारती मुद्रणालय
८३२ ई, शाहुपुरी ४ थी गल्ली,
कोल्हापूर - ४१६००१.
फोन : ०२३१-२६५४३२९

**किंमत** : रु. १००/-

'आई माझा गुरू
आई कल्पतरू
सौख्याचा सागरू
आई माझी'

असे साने गुरूजी म्हणतात. 'आई' या शब्दाचा जर आपण अर्थ पाहिला तर, 'आ' म्हणजे आत्मा आणि 'ई' म्हणजे ईश्वर. रामायणात महर्षी वाल्मिकींनी रंगवलेले प्रभू रामचंद्र म्हणतात,

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि।'

खरोखर किती अचूक वर्णन आहे हे! आईपुढे स्वर्गाचेही माहात्म्य थिटे पडते. आईच्या प्रेमाची बरोबरी कोणीही करू शकत नाही.

## मनोगत

त्यावेळी माझे वय असेल १३-१४ वर्षे. खरंतर हे खेळण्याबागडण्याचं वय. पण अचानक आम्हाला शिक्षणासाठी खेडेगावातून कोल्हापूरला यावं लागलं. माझं गाव, माझी शाळा, गुरुजन, माझी माणसं, बाल मित्र-मैत्रिणी यांना सोडून येताना मला खूप अस्वस्थ वाटलं. या अस्वस्थतेतून मी एकाकी बनत चालले. माझ्या बालमनावर हा मोठा आघात होता. त्यातून मी माझ्या मनातील विविध भावभावनांना कागदावर उतरत चालले.

मी इयत्ता आठवीमध्ये कोल्हापुरातील श्री. वसंतराव जयवंतराव देशमुख हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला आणि माझ्या आयुष्याला कलाटणी मिळाली .मला मराठीचे अध्यापक श्री. ए. एस. पोवार सर यांनी कविता लिहिण्यास सांगितले आणि मग माझ्यातील सुप्त गुण शोधण्यास मदत झाली. तसेच खरात सरांनी लेखनास प्रोत्साहन दिले. मी लिहिलेली प्रत्येक कविता शाळेच्या काच फलकावर लावली जाऊ लागली अन् तिथून लेखनाच्या प्रवासास सुरुवात झाली. मी लिहिलेल्या कविता प्रसिद्ध होऊन त्या वाचल्या जातात, त्यावर चर्चा होतात हा सुखद अनुभव होता.

त्यानंतर मी विवेकानंद कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथे मराठीचे प्रा. भाऊसाहेब गोसावी सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आणि मी कवितांसोबत विविध विषयावर लेख लिहू लागले. माझ्या लिखाणाच्या प्रवासामध्ये दै. पुढारीचे श्रीराम पचिंद्रे सर, तसेच दै. तरुण भारतचे मनोज साळुंखे सर आणि विनायक भोसले सर यांचा मोलाचा वाटा आहे. मराठीतील आघाडीचे व प्रसिद्ध लेखक आणि माझ्या बाबांचे गुरु प्रा. डॉ. राजन गवस यांच्यासोबत झालेली चर्चा, प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मला लाख मोलाचे आहे. त्यासोबत आई, बाबा, दादा, मित्र परिवाराची कौतुकाची थाप आणि नातलग यांचे सहकार्य लाभले त्यामुळेच माझ्या लेखनाचे भरण पोषण सुरू आहे.

याबरोबर भारती मुद्रणालयाचे मालक श्री. निहाल शिपुरकर, त्यांचे कर्मचारी आणि माझे हस्तलिखित तपासून कवितासंग्रह छापण्यापर्यंत ज्यांनी मनापासून धडपड केली ते प्रा. डॉ. आप्पासो बुडके यांचे सहकार्य मी विसरू शकणार नाही. वरील सर्वांचा मी ऋणी आहे.

**– संयोगिता संजय पाटील**

# अनुक्रमणिका

१. प्रेम / ७
२. रुसून बसलेला पाऊस! / ९
३. माझं मन / ११
४. आठवण / १२
५. तिच्याच वाट्याला हे का? / १३
६. माझा गाव / १५
७. सुखाचे क्षण / १६
८. गरज सगळ्यांनाच असते / १७
९. फुलपाखरू / १८
१०. अविस्मरणीय पाऊस / १९
११. कशासाठी काय लागते? / २१
१२. मैत्री / २२
१३. आयुष्य आलं की टेन्शन येतच / २३
१४. नटखट सकाळ / २४
१५. मी म्हणजे तू / २५
१६. नाही / २६
१७. च्या मायला सगळंच लय भारी / २७
१८. लहान व्हायचंय / २९
१९. हे असंच करायचं असतं / ३१
२०. दिवाळी / ३२
२१. परीक्षा / ३३
२२. कधी कधी असं वाटतं की / ३४
२३. बाबा / ३५
२४. आई / ३६
२५. आजी-आजोबा / ३७
२६. भूकंप / ३८
२७. आयुष्य / ३९
२८. मित्र / ४१
२९. तुझ्यात सामावून जायचंय! / ४२
३०. तू / ४३
३१. माझा मित्र / ४४
३२. जीवलग / ४५
३३. आठवणी / ४६
३४. आयुष्याचं गणित / ४७
३५. द्विधावस्था / ४८
३६. कधीतरी असंही जगून पाहा! / ४९
३७. तुझे माझे नाते / ५०
३८. तुजविण / ५१
३९. तू / ५२
४०. असंच दिवस जावं / ५३
४१. शिवाय / ५४

## १. प्रेम

लहानपणी आई
चालायला, बोलायला,
पळायला, खायला, वागायला शिकवते;
पण आयुष्यात
प्रेम करायला कोणीच
कोणाला शिकवत नसतं
प्रेम हे असंच असतं.
प्रेम हे फार सुंदर असतं
अगदी उमललेल्या फुलाप्रमाणं,
खटवीत, पालवीने भरलेलं
स्वच्छंद फुलपाखराप्रमाणे विहरणारं
हे प्रेम असतं.
स्वच्छंदपणे नदीप्रमाणे वाहणारं
विश्वासाची जोड असणारं
आपुलकीचा खांदा देणारं
मरताना जगायला शिकवणारं
असं हे प्रेम असतं.
प्रेम आयुष्यात नक्की करावं

प्रेम हे असंच असतं
प्रेमात पडल्यावर एल.एल.बी. न करता सुद्धा
खोटं बोलायला जमतं
वरून कितीही
कामात असलं तरी मन
त्याच्यातच गुंतलेलं असतं
सगळी म्हणतात
प्रेम आंधळं असतं
पण मी म्हणते
प्रेम बहिरंसुद्धा असतं
कुणीही कितीही सांगितलं
तरी मधमाशी जशी मधाला
तसं मन प्रेमाला चिकटून बसतं
आजकाल प्रेम म्हणजे टाईमपास
असं म्हटलं जातं
प्रेम आणि टाईमपास यामध्ये
जमीन-आसमानचा फरक आहे
टाईमपास हा काही तासांपुरता असतो
पण प्रेम मात्र जन्मजन्माचं असतं
प्रेम म्हणजे विश्वास,
एकमेकांशी साधलेला संवाद,
एकमेकांची ओळख,
ज्याला प्रेम या शब्दाचा अर्थच
कळालेला नाही तोच आणि तोच
करू शकतो आयुष्यात
फक्त आणि फक्त
टाईमपास.



## २. रुसून बसलेला पाऊस!

वाट पाहते मी
भल्या सकाळी
रोज सायंकाळी
रिमझिम रिमझिम
पावसा ये
नेसूनि हिरवा शालू
बघूनी मन प्रसन्न होऊ दे
चिमणी-पाखरे, फुलपाखरे
भिरभिरतील तुझ्या थेंबाने
झाडे, वेली, पाने-फुले
बहरतील तुझ्या स्पर्शाने
गायी-गुरे बघतात
रान कुठे हिरवे
जीवसृष्टी आतुरतेने
वाट पाहते तुझी

## ३९. तू

माझ्या गालावर पडणारी गोड खळी तू,
डोळ्यांतील प्रेममय भाव तू,

प्रेम शब्दाचा अर्थ तू,
विश्वासाला जागणारा तू,

माझ्या मेहंदीमधील दडून
बसलेल नाव तू,

मला सुखात कवेत घेणारा तू,
आणि दुःखात अश्रुही पुसणारा तुच

माझ्या ओठांवरील प्रेममय हास्य तू,
पैंजणांमधील खळखळून हसणारे घुंगरू तुच,

मी तयार केलेल्या,
प्रेममय वाटेवरची,

सुरुवात तू आणि
शेवटही तुच!



## ४०. असंच दिवस जावं

तू यावं, मी पहावं
तू बोलावं, मी प्रेमबोल झेलत फक्त हं म्हणावं

तू रुसावं, मी मनवावं
तू मागावं, मी द्यावं,

तू रडावं, मी अश्रू पुसावं,
तू घाबरावं, मी तुला मिठीत घ्यावं
अन् हरवून जावं

तू चालावं अन् मी तुझ्या पाठनं पळावं,
आणि चालता चालता तू थांबावं,
मग मी मागेच कुठेतरी दडून बसावं,
आणि तू हळूच मागे बघितल्यावर,
मी काहीतर शोधल्यासारखं करावं,
तू बोलवावं अन् मी हमखास यावं,
तू लाजावं, मी हसावं
असंच दिवस जावं,
असंच दिवस जावं!

## ४१. शिवाय

बशीशिवाय कप नाही
पाटीशिवाय पेन्सिल नाही.

सूर्याशिवाय उजेड नाही
रात्रीशिवाय झोप नाही

शाळेशिवाय ज्ञान नाही
शिक्षकाशिवाय आपुलकी नाही

आईशिवाय माया नाही
वडिलांशिवाय छाया नाही

झाडांशिवाय श्वास नाही
फुलांशिवाय सुगंध नाही

मैत्रीशिवाय प्रेम नाही
अभ्यासाशिवाय पर्याय नाही

पाण्याशिवाय जीव नाही
सुख-दुःखाशिवाय जीवन नाही

स्त्रीशिवाय घर नाही
भावाशिवाय राखी नाही

निसर्गाशिवाय सौंदर्य नाही
पंखांशिवाय पक्षी नाही.